www.research-Chronicler.com

e-ISSN - 2347-503X
p-ISSN - 2347-5021



# Research Chronicler

## International Multidisciplinary Research Journal

Vol. VI Spl. Issue IV November 2018

: Executive Editor :
Dr. Manjushri Bobade

: Editor-In-Chief :
Dr. Sanjay Nagarkar

C.S.M's Arts & Com. College
CHAKAN
410501
Tal-Khed, Dist-Pune.

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे | बदलती शैक्षणिक धोरणे आणि रयत शिक्षण संस्थेचे योगदान | 38 |
| 9 | डॉ. पांडुरंग भोसले व डॉ. भानुदास शिंदे | कर्मवीर अण्णांचे जीवन व तत्त्वज्ञान | 44 |
| 10 | Sanjay Dattajirao Thorat | The Biographies of Karmveer Bhaurao Patil | 49 |
| 11 | Prof. Sunil S. Deokar | Vision of Dr. Karmaveer BhauraoPatil in 21st Century through *'Earn while you Learn'* | 51 |
| 12 | डॉ. संजय नगरकर | बदलती शैक्षणिक धोरणे आणि रयत शिक्षण संस्थेची धोरणे | 54 |
| 13 | डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर | डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक विचार | 58 |
| 14 | प्रा. डॉ. कदम संतोष तुकाराम | कर्मवीर भाऊराव पाटील यांची वसतिगृह विषयक संकल्पना | 63 |
| 15 | डॉ. सीमा नाईक-गोसावी | रयत शिक्षण संस्थेची विवेकी वाटचाल | 66 |
| 16 | डॉ. वैशाली पाटील व प्रा. नम्रता मेस्त्री | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 68 |
| 17 | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची पत्रे: वाङ्मयीन व सामाजिक आकलन | 72 |
| 18 | डॉ. गणेश विष्णू लोखंडे | लोकसमूहाच्या निकोप सामाजिक आणि मानसिक आकारणात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे योगदान | 77 |
| 19 | प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत | संस्कारांची शिदोरी कमवा व शिका योजना | 81 |
| 20 | डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील | कर्मवीरांचे जीवन चरित्र: एक विचार | 86 |
| 21 | प्रा. रेखा व्ही. इंगोले | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य | 90 |





Principal
C.S.M's Arts & Commerce Col
Chakan, Tal-Khed, Dist-Pune

University Grants Commission, New Delhi Recognized Journal No. 41311
ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X

# श्रमसंस्काराची शिदोरी : कमवा व शिका योजना

प्रा. डॉ. शिवाजी एंडाईत

*सहयोगी प्राध्यापक, चाकण शिक्षण मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय चाकण*

इ. स. १७ व्या शतकात युरोपिय देशात औद्योगिक क्रांती झालेली दिसते. युरोपिय देशांकडे आधुनिक यंत्र, तंत्रज्ञानाचे ज्ञान होते. शस्त्रास्त्रे व ज्ञानाच्या विविध विद्याशाखा त्यांनी अवगत केल्या होत्या. त्यामानाने भारतीय समाज कितीतरी मागासलेला, अंधश्रद्धाळू व धर्मवेडा होता. जाती–जातीतील भेदाभेद, कर्मकांड, अनिष्ट चालीरितीत भारतीय समाज अडकलेला होता. भारतीय समाजात राष्ट्रभावनेचा अभाव होता. त्यांच्यात एकजूट नव्हती, कुठलीही ध्येयनिष्ठा नव्हती, अस्मितेचा अभाव होता, या बाबी महत्त्वाकांक्षी इंग्रजाच्या लक्षात आल्या. लोकांचे अज्ञान, त्यांचा रानटीपणा, मागासलेपणा या बाबी व्यापार वृद्धीसाठी तसेच, सत्ता मिळविण्यासाठी अधिक सोयीच्या आहेत, हे त्यांना निरीक्षणांती समजले. व्यापाराच्या निमित्ताने इंग्रज भारतभर विखुरले. कंपनीचा मूळचा उद्देश भारताची आर्थिक लूट करणे हाच होता, त्यात ते सफलही झाले. इंग्रजानी अर्थकारणाबरोबरच राजसत्ता हस्तगत करण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला मूर्तरुप १८१८ मध्ये पेशवाईच्या अस्ताने दिले. आणि संपूर्ण भारतात इंगजी सत्तेचा अंमल सुरू झाला. थोडक्यात, इंग्रज लोक भारतीयांपेक्षा आधुनिक, पुरोगामी विचारसरणीचे होते. त्यांच्यामुळेच भारतीयांना आधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय झाला, पुरोगामी विचारांचे संस्कार त्यांनीच केले, हे तितकेच सत्य आहे, असेच म्हणावे लागेल.

इंग्रजी अव्वल कालखंडात राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वाङ्‌मयीन इ. क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घडली. मध्ययुगीन मराठी वाङ्‌मयाच्या परंपरेला छेद देऊन नवीन विचारधारा भारतीयांनी स्वीकारण्यास सुरूवात केली. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, गोपाळ गणेश आगरकर इ. काही प्रमुख समाज सुधारकांनी व विचारवंतांनी या शतकात प्रबोधनाचे, समाज जागृतीचे–परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले. स्वसमाजातील अपप्रवृत्ती, जातिभेद, कर्मकांड, अज्ञान, अंधश्रद्धा, मागासलेपणा इ.मुळे आपण मागास असल्याची जाणीव त्यांना झाली. यातूनच प्रबोधनाची बीजे रूजल्याचे दिसते. इहवाद, प्रयत्नवाद, वास्तववाद, प्रत्यक्ष कृती, तर्कबुद्धीला महत्त्व देणे अपेक्षित आहे. त्यातूनच सुधारणावादी, प्रबोधनवादी चळवळीला व साहित्य निर्मितीला प्रेरणा मिळाली. भारतीय समाजाला अज्ञानातून, मागासलेपणातून बाहेर काढण्यासाठी, शिक्षण हाच एकमेव पर्याय आहे, त्यामुळेच शिक्षणाच्या प्रचार–प्रसाराकरिता महात्मा ज्योतीराव फुलेंसारख्या द्रष्ट्या महापुरूषाने अहोरात्र कार्यात वाहून घेतल्याचे दिसते. एल्फिस्टनच्या शैक्षणिक धोरणामुळे त्याच्या दहा वर्षाच्या कालावधीत अनेक महत्त्वाची शैक्षणिक कामे झाली. गरीब जनतेला शिक्षण देण्यासाठी उत्तेजन देण्याचा त्याने आस्थेने प्रयत्न केला. मंबई इलाख्यात अनेक नवीन शाळा त्याने सुरू केल्या. पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना केली. नवीन नियतकालिके प्रकाशित करण्यासाठीचे प्रयत्न याच दरम्यान झाले. इंगजी शिक्षणाचा लाभ घेऊन येथील सनातनी ब्राह्मणांनी मात्र व्यवस्थेतील नोकऱ्या स्वत:साठी कशा राहतील, हाच स्वार्थ पाहिला. येथील गोर–गरीबांपर्यंत शिक्षण कसे पोहचणार नाही, याकरीता प्रयत्न केले. शेतकरी, गोर–गरीबांवर अन्याय करणे, त्यांचे शोषण करणे, हेच त्यांचे धोरण होते. सामान्य माणूस गुलाम कसा राहील, हीच मानसिकता त्यामागे होती. मात्र महात्मा फुले,

Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.